# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०६ मार्च, २०२५ / फाल्गुन १५, १९४६ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) शालेय शिक्षण मंत्री**
**(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(५) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**
**(७) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**
**(८) वस्त्रोद्योग मंत्री**
**(९) सहकार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### अमरावती विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते अदा करणेबाबत

**(१) * ३३० श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागामध्ये जीपीएफ, एनपीएस, डीसीपीएस खाते असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अमरावती विभागातील जीपीएफ, एनपीएस, डीसीपीएस खाते असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) या संदर्भात शासन निर्णय दिनांक १२/०६/२००९ व शासन निर्णय दिनांक १७/०२/२०२१ अन्वये आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा

आणि वाशिम या जिल्ह्यातील खाजगी अनुदानित शाळेतील भविष्य निर्वाह निधी, एनपीएस व डिसीपीएस खाते असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे थकित हप्ते अदा करण्यात आलेले आहेत. तथापि, अमरावती विभागातील उशिराने एनपीएस क्रमांक घेतलेल्या एकूण १०८ कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांचे सेवेत कायमस्वरुपी समायोजन करणेबाबत

**(२) * ८३२ श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अरुण लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शिक्षण परिषद यांच्यामार्फत समग्र शिक्षा अभियानासाठी ५८०० पदांची निर्मिती करण्यात आली असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकास आणि प्रशिक्षित उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्त केले जाणार आहे तसेच सांगली जिल्हा परिषदेने २६२ शिक्षकांची कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केली असून या कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती ही केवळ पोर्टलमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच राहणार असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००० ते सन २००५ पासून कंत्राटी तत्वावर कार्यरत असणाऱ्या ५८०० पदांपैकी ३१०५ इतकी पदे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार भरण्यात आली असून उर्वरित २६९५ शिक्षकांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत व उच्चशिक्षित शिक्षकांना समकक्ष पदावर सामावून घेण्याबाबत शासनाने आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२४-२०२५ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व नियुक्ती ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती होणार असल्याने नागपूर ग्रामीण येथे ४५० अर्ज, कामठी १०७ अर्ज, हिंगणा १५६ अर्ज, नरखेड २१६ अर्ज, काटोल ३२४ अर्ज, कळमेश्वर १७१ अर्ज, सावनेर २४० अर्ज, पारशिवनी १२५ अर्ज, रामटेक २५८ अर्ज, मौदा २३४ अर्ज, कुही १६५ अर्ज, उमरेड २०६ अर्ज व भिवापूर १३० अर्ज इतके कंत्राटी भरतीकरीता प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण सेवेक योजनेच्या पार्श्वभूमीवर नियमित पदावर प्रशिक्षित उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्त केल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलीआहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर भरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी प्रक्रिया न राबविता कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेण्याबाबत तसेच १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेला दोन नियमित पदे मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) समग्र शिक्षा या योजनेसाठी यापूर्वीच्या सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक अभियान व शिक्षक शिक्षण योजना एकत्रित करुन दिनांक ०१/१२/२०१८ रोजीच्या ६५ व्या कार्यकारी

समितीच्या बैठकीत सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार व्यवस्थापनाअंतर्गत ११११, कार्यक्रमाअंतर्गत १३,७१६ आणि जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यासाठी १२७३ अशी एकूण १६१०० पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

१० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांकरीता मंजूर दोन पदांपैकी एका पदावर कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शिक्षक व डी.एड व बी.एड अर्हताप्राप्त बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देणेबाबतचे दिनांक २३/०९/२०२४ चा शासन निर्णय दिनांक १०/०२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे. यास्तव या शाळांमध्ये कंत्राटी तत्वावर शिक्षक नियुक्त केले जाणार नाहीत.

तसेच जिल्हा परिषद सांगली यांनी २६२ रिक्त पदांवर सेवानिवृत्त कंत्राटी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, सदरची नियुक्ती १० पटापेक्षा कमी शाळेवरील कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबतच्या दिनांक २३/०९/२०२४ च्या तरतूदीनुसार करण्यात आलेली नसून, पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या कारणास्तव दिनांक ०७/०७/२०२३ च्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरची नियुक्ती नियमित शिक्षक नियुक्ती होईपर्यंतच राहणार आहे.

(२) याबाबत शासन निर्णय दिनांक ०८/१०/२०२४ नुसार समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत कार्यरत असणाऱ्या २९८४ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. समग्र शिक्षा योजनेतंर्गत कार्यरत इतर करार कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत शासनास शिफारस करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमधील निर्णयानुसार शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ अन्वये अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) १० व १० पेक्षा कमी पटंसख्या असलेल्या शाळांत कंत्राटी तत्वावर नियुक्ती देणेबाबतचा दिनांक २३/०९/२०२४ चा शासन निर्णय दिनांक १०/०२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्याबाबत

**(३) * ८४२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला जिल्ह्याला मिळावे, याकरीता विविध सामाजिक संस्था व संघटनांचे पदाधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी, स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेकडून प्रकर्षाने मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांतील जवळपास ४४० वरिष्ठ महाविद्यालये येतात, यातील सर्वाधिक वरिष्ठ

महाविद्यालये ही अकोला, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यात असल्याने या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जवळपास १०० कि.मी.चा प्रवास करुन विद्यापीठात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला हे वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सोयीस्कर व मध्यवर्ती ठिकाण असल्याने, विद्यार्थ्यांना १०० कि.मी.चा प्रवास करताना होणारा त्रास कमी होईल व विद्यापीठाचे शैक्षणिक काम सुरळीत चालेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक संघटना व त्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच विद्यार्थी, जनतेकडून होत असलेली मागणी लक्षात घेता मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) विद्यापीठांकडून शासन निधीतून उपपरिसर सुरु करण्याचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. तद्नुषंगाने उपपरिसर स्थापन करण्याबाबत समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित शाळांच्या इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) * २५२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १४ हजार अनुदानित शाळांपैकी १० हजार शाळांच्या इमारतींची दुरवस्था झाली असून त्या मोडकळीस आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक भरती ही पवित्र पोर्टलऐवजी संस्थास्तरावर व्हावी अशी शिक्षण संस्था /महामंडळाची मागणी असल्यामुळे पाच वर्षांपूर्वी शासनाने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे रद्द केल्याने शाळांना शिपाई कर्मचारी नाहीत, तसेच खाजगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेशित मुलांच्या शालेय शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे वेळेवर होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुरवस्था झालेल्या शाळांच्या नवीन इमारतींच्या बांधकामासाठी संस्थेकडे निधी उपलब्ध नाही त्यामुळे इमारत बांधकामासाठी शासनाने ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिगर व्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संस्था /महामंडळांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुरवस्था झालेल्या शाळांच्या नवीन इमारती बांधकामासाठी शासनाने ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिगर व्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संस्था /महामंडळांनी केलेल्या मागणीबाबत

शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) "युडायस प्लस" या पोर्टलवर शाळांव्दारे भरण्यात आलेल्या सन २०२३-२४ च्या माहितीनुसार एकूण २४,१५२ खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांपैकी २६१ शाळांमधील २७१ वर्गखोल्यांची दुरावस्था झाल्याचे दिसून येत आहे.
(२) राज्यातील शिक्षकभरती शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीमधील गुणांच्या आधारे पवित्र पोर्टल मार्फत करण्यासंदर्भातील धोरण दिनांक २३/०६/२०१७ व दिनांक २०/०६/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेतले आहे. तसेच शासन निर्णय ०७/०२/२०१९ अन्वये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी पात्र उमेदवारांची पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक सेवक पदावर अंतिम निवड खाजगी शैक्षणिक संस्था मुलाखतीच्या आधारे करील,असे निश्चित करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक ११/१२/२०२० अन्वये राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशत:/ पूर्णत: अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी प्रतिशाळा शिपाई भत्ता लागू करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये चतूर्थश्रेणी कर्मचारी पदावर कार्यरत कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर पदे व्यपगत होतील, अशी तरतूद करण्यात आली आहे.

राज्य शासनामार्फत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ अंतर्गत खर्चाची प्रतिपूर्ती करण्याकरीता सन २०१२-१३ ते सन २०२३-२४ पर्यंत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेमध्ये करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीसाठीची मागणी रुपये २९६५.६१ कोटी असून शासनाने सन २०१२-१३ ते २०२४-२५ या कालावधीत रुपये ११८८.१८ कोटी इतका खर्च केलेला आहे. आरटीई प्रलंबित शुल्काची रक्मक आता रुपये १७७७.४३ कोटी इतकी आहे.
(३) असा प्रस्ताव प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील व्यवस्थापन हे खाजगी संस्थामार्फत हाताळण्यात येत असल्याने या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व शैक्षणिक तसेच भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या संस्थांची आहे.

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांव्दारे फक्त सरकारी शाळांना बांधकाम व दूरूस्तीकरीता निधी दिला जातो. खाजगी शाळांना निधी मंजूर करणे अनुज्ञेय नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या कार्यालयातील अनियमिततेबाबत

**(५) * ५३७ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी (माध्य.) हे कार्यालयामध्ये रूजू झाल्यापासून त्यांचेकडे शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संच मान्यता दुरुस्ती, टप्पा अनुदान वाढ प्रलंबित ठेवणे, अनुकंपा

प्रकरणे, शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीस मान्यता देणे, थकबाकी देयके, सेवानिवृत्ती प्रकरणे व इतर अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, यवतमाळ या कार्यालयाची मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडून नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय यवतमाळ या कार्यालयात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचे तपासणीमध्ये निदर्शनास आले असून त्याबाबतचा अहवाल शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा. पुणे यांना पाठविण्यात आल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या अधिनस्त वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय हे कार्यरत असून शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचा सदर कार्यालयावर प्रशासकीय नियंत्रण नसल्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या कार्यालयामध्ये अनियमितता होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद यवतमाळ कार्यालयातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत तसेच कार्यालय प्रमुखांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) दिनांक २४/०६/२०२४ रोजी मा.आमदार श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीमध्ये प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती कार्यालयामार्फत दिनांक २५/०६/२०२४ रोजी तपासणी पथक नेमण्यात आले. सदर तपासणी पथकाचा अहवाल दिनांक २८/०८/२०२४ च्या पत्रान्वये शिक्षण सहसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे कार्यालयास सादर करण्यात आला. सदरचा अहवाल मोघम स्वरुपाचा असल्याने, सदर प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे यांनी दिनांक २०/०२/२०२५ च्या पत्रान्वये शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविले आहे.

तसेच, याप्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालयाने दिनांक १७/०२/२०२५ च्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत केली असून पुढील कार्यवाही सूरू आहे.

----------------

## राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या इतर माध्यमांच्या शाळेवरील नियुक्तीबाबत

**(६) * ५०५ श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त पदांच्या ८० टक्के पदे पवित्र पोर्टलद्वारे भरती करण्यात आली असून पवित्र पोर्टल मधील जाहिरात प्रसिध्द करण्यापुर्वी भाषेच्या माध्यमानुसार त्या रिक्त पदांची माहिती संकलित न करता, पवित्र पोर्टलद्वारे भाषा माध्यमानुसार भरती प्रक्रिया राबविली गेली नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऊर्दू व कन्नड माध्यमांच्या शाळांवर ऊर्दू व कन्नड भाषेतून शिक्षण न घेतलेले व या भाषेचे ज्ञान नसलेले शिक्षक नेमले गेले असल्याने विविध संघटनांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भाषेच्या माध्यमानुसार त्या रिक्त पदांची माहिती संकलित न करता, पवित्र पोर्टलद्वारे भाषा माध्यमानुसार भरती प्रक्रिया न राबविणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ अनुसार ८० टक्के पदे पवित्र पोर्टलमार्फत भरण्यात येत आहेत. यामध्ये शासन निर्णय दिनांक १९/०६/२०१३ मधील सेमी इंग्रजी माध्यमाच्या सुरु केलेल्या तुकडीवर व्यावसायिक शिक्षण (डीएड/बीएड) इंग्रजी माध्यमातून झालेल्या उमेदवाराची नियुक्ती करणेबाबतची तरतूद असल्याने, बिगर इंग्रजी माध्यमाच्या मराठी, हिंदी, उर्दू व कन्नड माध्यमांच्या शाळांमध्ये यानुसार पहिल्या टप्प्यातील पदभरतीच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
तसेच, शासन निर्णय, दिनांक २५/०२/२०१९ मधील तरतूदीनुसार बिगर इंग्रजी माध्यमाच्या मराठी, हिंदी व उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये अध्यापन करण्यात येत असलेल्या भाषा विषयांकरीता (उदा. मराठी, हिंदी व मराठी) पदवी स्तरावर संबंधित भाषा विषय मुख्य विषय घेऊन उत्तीर्ण उमेदवारांची शिफारस करण्यात आलेली आहे.

सेमी इंग्रजी व भाषा विषय वगळता इतर सर्व पदांसाठी इयत्ता १० वीचे माध्यम विचारात घेऊन पदभरतीची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांची मागणी विचारात घेऊन, सेमी इंग्रजी व भाषा विषयाच्या पदभरतीसाठी देखील इ.१० वीचे माध्यम विचारात घेण्याबाबत दिनांक ०६/०९/२०२४ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापक व प्राध्यापकांच्या विविध समस्यांबाबत

**(७) * ७६३ श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या व प्राध्यापकांच्या नेट - सेट, एम.फील, कॅस, पी. एचडी. वेतनवाढ, प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ यांसारख्या इतर विविध प्रश्नांसाठी संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक २४ ऑगस्ट,२०२४ रोजी निवेदन देऊन बैठक घेण्याची मागणी केली असून उपरोक्त प्रश्नांबाबत तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व प्राध्यापक संघटनांसोबत आयोजित केलेल्या बैठकीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांच्या व महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट - सेट, एम.फील, कॅस, पी. एचडी. वेतनवाढ, प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत समितीच्या बैठकीत केलेल्या शिफारशींनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी (पदवीधर) यांनी दिलेल्या निवेदनानुसार दिनांक २३/०८/२०२३ रोजी तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या विविध प्रश्नासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळता इतर प्रकरणावर कार्यवाही विचाराधिन आहे.
(३) एम. फील व पी. एचडी प्राप्त आध्यापकांना प्रोत्साहनपर वेतनवाढ पुर्ववत लागू करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे. राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदांपैकी ४४३५ पदे भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावावर वित्त विभागाने विचारणा केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे. तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारित दर ०१/०४/२०२३ पासून लागू करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा सहकारी बँक भरती प्रक्रियेकरीता
## नियुक्त कंपन्यांची चौकशी करण्याबाबत

**(८) * ३१५ श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सहकार आयुक्तालयाने जिल्हा बँक भरती प्रक्रियेतील गैरव्यवहार थांबविण्यासाठी भरती प्रक्रिया ऑफलाईनऐवजी ऑनलाईन करण्याचे धोरण स्वीकारले असून जिल्हा बँकांची भरती प्रक्रिया राबविण्यासाठी सहा कंपन्यांचे पॅनल गठित करुन माहे मार्च, २०२४ मध्ये सहा कंपन्यांची तालिका प्रसिध्द केली असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार आयुक्तालयाने जिल्हा सहकारी बँकांच्या नोकर भरतीसाठी पॅनलवर घेतलेल्या "वर्कवेल इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड" या कंपनीने पॅनलवर येण्यासाठी सादर केलेली कागदपत्रे बोगस असल्याची माहिती माहितीच्या अधिकारात प्राप्त झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेतील विविध ७०० पदांची भरती प्रक्रिया 'वर्कवेल इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने सुरू केल्यामुळे सदरहू बँकेच्या पदभरतीची लेखी परीक्षा पुणे जिल्ह्यातील विविध केंद्रावर घेतल्याने या भरतीविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुभवाची बोगस प्रमाणपत्रे सादर करून पॅनलमध्ये प्रवेश मिळविलेल्या कंपनीला ७०० पदांच्या भरतीचे काम दिल्यामुळे या कंपनीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे बँक भरतीसाठीच्या पॅनलमध्ये प्रवेश मिळविलेल्या कंपनीच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली तसेच बनावट कागदपत्रे देणाऱ्या संबंधित कंपनीस पॅनलमधून काढून टाकण्याबाबत, व या सर्व कंपन्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करून बँकांची भरती प्रक्रिया शासनामार्फत राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

वर्कवेल इन्फोटेक प्रा.लि. या कंपनीने सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्र यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दिनांक १४/०१/२०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व सातारा यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व जिल्हा उपनिबंधक, सहकारी

संस्था, सातारा यांनी चौकशी करुन आपला अहवाल अनुक्रमे दिनांक २८/०१/२०२५ व दिनांक २४/०१/२०२५ रोजी सादर केला आहे. सदर अहवालानुसार वर्कवेल इन्फोटेक लि. कंपनीने ऑनलाईन भरतीसाठीच्या तालिकेसाठी सादर केलेली कागदपत्र बनावट नसल्याचे दिसून आले.

अहमदनगर जिल्ह्यामधील परीक्षा केंद्रामध्ये संगणक संचाची संख्या कमी असणे, ऑनलाईन युपीएस व जनरेटर बॅकअप व टेक्नीकल सर्पोट उपलब्ध नसणे व या सुविधा असणारे जिल्ह्यातील केंद्र पुढील सहा महिन्यासाठी उपलब्ध न होणे इत्यादी कारणांमुळे शासन निर्णय दिनांक १५/०६/२०१८ मधील तरतूदीनुसार अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील विविध पदांची परीक्षा नजीकच्या जिल्ह्यामध्ये म्हणजेच पुणे जिल्ह्यातील विविध केंद्रावर घेण्यात आली. तथापि, या संदर्भात उमेदवारांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) होय.

(५) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार त्यांच्या व्यवस्थापनामध्ये त्या स्वायत्त आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९-अ अन्वये दिनांक १५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहकारी बँकामधील पदभरती प्रक्रीया फक्त ऑनलाईन पध्दतीने व त्रयस्थ संस्थेमार्फत करण्याचे निर्देश सर्व सहकारी बँकांना देण्यात आले होते. सदर शासन निर्णयामध्ये दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करुन सहकार आयुक्तालयाच्या स्तरावर पदभरती प्रक्रीया राबविण्यासाठी अधिकृत त्रयस्थ संस्थांची तालीका (पॅनल) तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सहकार आयुक्तालयामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील सरळसेवा सेवकभरती प्रक्रीया निर्विवाद व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने त्रयस्थ संस्थांचा तालिकेमध्ये समावेश करण्यासाठी दैनिक वृत्तपत्र तसेच सहकार आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर दिनांक १९/०४/२०२३ रोजी जाहिरात देऊन पात्र संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी अपर आयुक्त व विशेष निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये नाबार्डचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे राज्य सहकारी बँकेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला होता.या छाननीमध्ये शासन निर्णय दिनांक १५/०६/२०१८ व दिनांक २३/०६/२०२२ मधील सर्व निकषांची पूर्तता करीत असलेल्या कंपन्यांचा सहकारी बँकांच्या नोकरभरती तालिकेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व मराठी भाषा अध्यासन केंद्र उभारणीचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(९) * ३२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००८ मध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी जवाहरलाल नेहरु विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व मराठी भाषा अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला असूनही सदर केंद्राचे काम १६ वर्षानंतरदेखील सुरु झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान आयोजित केलेल्या आज़ादी का अमृतमहोत्सव समितीच्या बैठकीत सदरील अध्यासन केंद्रास १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने सांस्कृतिक कार्य विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून मंजूर निधी जवाहरलाल नेहरु विश्वविद्यालयास वितरीत केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील अध्यासन केंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) जवाहरलाल नेहरु विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथे मराठी भाषेचे अध्यासन सुरु करण्यासाठी दिनांक २९/०८/२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १.५० कोटी एवढा निधी मंजूर केला आहे.
(२) स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव एकछत्र योजनेतंर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी दिनांक २९/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १० कोटी एवढा निधी मंजूर केला आहे.
(३) छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी रुपये १० कोटी एवढा निधी सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागास प्राप्त झाला होता. सदरचा निधी विभागामार्फत जवाहरलाल नेहरू विद्यापीठास वितरीत करण्यात आला आहे.
(४) सदरील अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबतची बाब जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या स्तरावरील असून, विभागाकडून पाठपूरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१०) * ११५ श्री.विक्रांत पाटील, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे २५,१०० बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आल्याची तसेच अझिथ्रोमायसिन ५०० या ८५ लाख औषधी गोळयांचा पुरवठा करण्यात आल्याचे अन्न व औषध प्रशासनाने माहे डिसेंबर, २०२४ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान केलेल्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याने भिवंडीतील एका कंपनीच्या दोन संचालकांविरुध्द माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाणे, अंबाजोगाई येथे एकूण ४ आरोपींविरूध्द प्रथम खबर अहवाल क्र.५२२/२०२४, दिनांक ०५/१२/२०२४ रोजी दाखल करण्यात आला असून पोलीस विभागामार्फत पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * ३१६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील ९ क्रीडा संकुलांची कामे अपूर्णावस्थेत असून उर्वरित ६ क्रीडा संकुलांची कामे अद्याप सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा संकुलांची कामे विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्यासाठी शासनाने प्रत्येकी १ कोटी रुपयांची तरतूदही केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या तालुक्यांमधील क्रीडा संकुल बांधून पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडील शिल्लक निधी दुसऱ्या तालुक्यातील क्रीडा संकुल बांधण्याकरीता वर्ग करण्याचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्पष्ट आदेश देऊनही रायगड जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची कामे पूर्ण न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच क्रीडा संकुलांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) रायगड जिल्ह्यातील १५ तालुका क्रीडा संकुलांपैकी ८ तालुका क्रीडा संकुलांची कामे पूर्ण झाली असून त्याचा वापर व्यायाम व सरावासाठी खेळाडू व नागरिकांकडून होत आहे. कर्जत व खालापूर या २ तालुका क्रीडा संकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. उरण तालुका क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. महाड तालुका क्रीडा संकुलाची जागा हस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे. मुरुड,अलिबाग व पोलादपूर या ३ तालुका क्रीडा संकुलांसाठीअद्याप जागा प्राप्त झालेली नाही. सदर ठिकाणी जागा प्राप्त होण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

(२) शासन निर्णय, दिनांक २३ मार्च, २०२२ अन्वये तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार तालुका क्रीडा संकुलासाठी यापुर्वी असलेली रुपये १ कोटीची अनुदान मर्यादा सुधारित करुन रुपये ५ कोटी इतकी करण्यात आली आहे. तथापि, बांधकाम पूर्ण झालेल्या /प्रगतीपथावर असलेल्या/अपूर्ण असलेल्या क्रीडा संकुलांना रुपये ३ कोटी इतकीअनुदान मर्यादा निश्चित केली आहे.
(३) नाही.
(४) व (५) रायगड जिल्ह्यातील ८ तालुका क्रीडा संकुल पूर्ण असून उर्वरित संकुलाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. सबब, प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना विना निविदा कंत्राट देण्याबाबत

**(१२) * ३९९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक कौविउ/२०२१/प्र.क्र.१४०/प्रशा.२, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी निर्गमित केला असून, सदर शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना विना निविदा कंत्राट देण्याबाबत मान्य करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीसह शासनाच्या विविध विभागांनी उक्त निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाकडून केली जात असून, अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याने बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना १० लाख रुपये पर्यंतचे कंत्राट विनानिविदेने मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २४ ऑगस्ट,२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना विना निविदा कंत्राट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) दिनांक १७/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना शासकीय/निमशासकीय विना निविदा कामे वाटून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक २८/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये विनानिविदा देण्यात येणाऱ्या कामांच्या वित्तीय मर्यादेत सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार सदर संस्थांना रुपये १०.०० लक्ष पर्यंतची शासकीय/निमशासकीय कामे विना निविदा देण्यात येत आहेत.
(२) व (३) दिनांक २८/०८/२०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत विविध बेरोजगार सेवा सहकारी संस्थाकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून

माहे सप्टेंबर, २०२४ ते माहे, जानेवारी, २०२५ या कालावधीत बेरोजगार सेवा सहकारी संस्थाना शासनाच्या विविध विभागांमार्फत एकूण रुपये ११९.०५ लक्ष इतक्या रकमेच्या कामांचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांमधील पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१३) * ८८१ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता १२ वीच्या परीक्षेच्या निकालानंतर जून-जुलैमध्ये औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रम (फार्मसी) शाखेची प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया सुरू होणे अपेक्षित असताना विभागातील अनियमित कारभारामुळे ही प्रवेश प्रक्रिया सुमारे ६ महिने लांबवली गेली असून दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेतून प्रवेश पूर्ण झाले असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषध निर्माणशास्त्र शाखेतील पदवी/पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रलंबित असल्याने बी फार्मसीचे ३४ हजार १० प्रवेश निश्चित झाले मात्र १२ हजार ५०२ (२६.८७ टक्के) जागा रिक्त राहिल्या असून बी.फार्मसीकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये फार्मसी महाविद्यालयांमध्ये १६ हजारांहून अधिक जागा अद्यापही रिक्तच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया योग्य रितीने वेळेत पार पाडण्याबाबत तसेच वार्षिक निकाल वेळेत जाहीर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली तसेच या रिक्त जागांना जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशत : खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता औषधनिर्माणशास्त्र या पदवी अभ्यासक्रमाची प्रथम वर्षासाठीची उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकृती प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ रोजी सुरु करण्यात आली होती. तद्नंतर औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांनी मान्यते प्रक्रियेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेत, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची मान्यता प्रक्रिया ऑक्टोबर, २०२४ अखेरपर्यंत राबविण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला होता.सदर निकालाच्या अनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र हा अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने, त्याचप्रमाणे उमेदवारांना जास्तीत जास्त जागांचा पर्याय उपलब्ध व्हावा, याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अर्ज करण्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

तद्‌नंतर, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून माहे ऑक्टोबर पासून प्रवेश फेऱ्यांचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत राज्यात राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू करण्यात आली. परिणामी, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेल्या संस्थांना शासन निर्णय निर्गमित करुन मान्यता देण्याची कार्यवाही स्थगित झाली होती. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या दोन प्रवेश फेऱ्या झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आली.

विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना शासन मान्यता देण्याची कार्यवाही पुनश्च सुरु करण्यात आली. तदनंतर माहे, नोव्हेंबर मध्ये पदविका आणि पदवी अभ्यासक्रमाची तिसरी प्रवेश फेरी आयोजित करून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली.

(२) होय, खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ नंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ आणि तुलनेने या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी घटलेला कल विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या १६ हजारांहून अधिक जागा रिक्त राहिल्या आहेत.

(३) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया विहित वेळेत पार पाडण्यासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेस संबंधित संस्थांना विहित वेळेत मान्यता देण्याबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विनंती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर मान्यता प्रक्रिया वेळेत राबविणे व एकंदरीत कार्यपध्दतीबाबत शासनस्तरावरुन देखील फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना कळविण्याची कार्यवाही सुरु आहे.

औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस विलंब झाला असल्याने, शैक्षणिक सत्र वेळेत पूर्ण होण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी अतिरिक्त तसेच सुटीच्या दिवशी तासिका घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे धोरण अंगिकारले आहे. तसेच, विद्यापीठाकडून शैक्षणिक कार्यभार पूर्ण करण्यासाठी उपाययोजना राबविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात २३२ शाळा मान्यतेविनाच सुरु असल्याबाबत

**(१४) * ९५६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २३२ शाळा या मान्यतेविनाच चालविल्या जात असून या शाळांमध्ये १६६६ शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून या शाळांना "यूडायस कोड" देखील देण्यांत आल्याचे दिनांक ४ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मान्यतेविना चालविल्या जाणाऱ्या २३२ शाळांमधील ३९,८१९ विद्यार्थ्यांचे भवितव्याविषयी चिंता निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "आरटीई" कायद्यानुसार मान्यतेविना सुरु असलेल्या शाळांना एक लाख रुपयांचा दंड करण्याची तरतूद आहे, याशिवाय मान्यतेविना जेवढया कालावधीकरीता शाळा सुरु आहेत, त्या शाळांना प्रत्येक दिवसासाठी रुपये १० हजार इतका दंड आकारण्यात यावा अशी तरतूद असतानाही दंड वसूल करण्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मान्यतेविना सुरु असलेल्या शाळांवर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत तसेच या शाळांना "यूडायस कोड" देणाऱ्या शाळा मान्यतेविना सुरु असल्याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

राज्यामध्ये खाजगी व्यवस्थापनाद्वारे संचालित करण्यात येणाऱ्या शाळांपैकी ३८८ शाळा अनधिकृतपणे चालविल्या जात असल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८(५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरू असणाऱ्या शाळांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देश शासन निर्णय, दिनांक १९/०६/२०१०, दिनांक १०/११/२०२० व दिनांक १८/१२/२०२३ द्वारे देण्यात आले आहेत. तसेच आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे याबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली असून त्या अंतर्गत आतापर्यंत दंड आकारण्यात आलेल्या व दंड वसूल केलेल्या शाळांची संख्या ३६ इतकी आहे. तर, फौजदारी गुन्हा दाखल केलेल्या शाळांची संख्या ९९ इतकी आहे.
(४) व (५) शासनस्तरावर अनधिकृत शाळांवर कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, शासन निर्णय, दिनांक १०/०३/२०१० मधील तरतुदींचे पालन करीत असलेल्या सन २०१३ पूर्वीच्या अनधिकृत शाळा व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील तरतुदींची पूर्तता करीत असलेल्या शाळांबाबत तपासणी करून प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०१३ नंतरच्या अनधिकृतपणे सुरू असलेल्या शाळा जर उक्त नमूद अधिनियमातील तरतुदींचे पालन करीत असतील तर अशा शाळांच्या प्रस्तावावर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर निकषांची पूर्तता करीत नसलेल्या अनधिकृत शाळा बंद करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये 'विशेष शिक्षक' पदावरील नियुक्तीबाबत

**(१५) * ३०३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सुरू केलेल्या समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रम, अपंग समावेशित शिक्षण योजनांमध्ये समाविष्ट झालेल्या कंत्राटी शिक्षकांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये 'विशेष शिक्षक' या पदाची निर्मिती केली असून तीन

महिन्यांचा कालावधी होवूनही अद्याप एकही पद भरले नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे २,९८४ दिव्यांग शिक्षक नियुक्तीच्या प्रतिक्षेत असून सदरहू शासन निर्णयास आजमितीस ३ महिने होवूनही दिव्यांग शिक्षकांना 'विशेष शिक्षक' पदी कायमस्वरुपी नियुक्ती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच दिव्यांग शिक्षकांना 'विशेष शिक्षक' म्हणून कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनाकरीता समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत विशेष शिक्षकांचे केंद्रस्तरावर एक याप्रमाणे ४८६० राखीव पदांवर समायोजन करणेबाबतचा निर्णय शासन निर्णय दिनांक ८/१०/२०२४ अन्वये घेण्यात आलेला आहे. यानुसार समायोजनाची कार्यवाही तातडीने होण्याकरीता शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र कक्ष स्थापन करुन उमेदवारांची कागदपत्र पडताळणी/ छाननी करणेबाबतच्या सूचना शासन स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अशा विशेष शिक्षकांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन केंद्रस्तरावर एक याप्रमाणे पदस्थापना देण्याबाबतची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येणार असल्याने सदर कार्यवाहीस काही अवधी लागत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकण विभागातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये सहकार व लेखा पदविका तसेच सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र या परीक्षांकरिता केंद्र मंजूर करण्याबाबत

**(१६) * ५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा हे साधारण एक दशकाहून अधिक काळ साक्षरतेमध्ये सर्वोच्च स्थानावर असून दहावी व बारावी बोर्डात कोकण विभाग आज उच्च स्थानावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जी.डी.सी. ॲण्ड ए. आणि सी.एच.एम. म्हणजे शासकीय सहकार व लेखा पदविका आणि सहाकरी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र या परिक्षेमुळे विद्यार्थ्यांना ऑडिटिंग, अकाउंटन्सी आणि सहकारी क्षेत्रातील त्यांच्या करिअरच्या मार्गदर्शनासाठी मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकण विभागात अनेक शैक्षणिक परीक्षांना परीक्षा केंद्र नाहीत, तसेच जी.डी.सी.ॲण्ड ए. आणि सी.एच.एम. ह्या सहकारी क्षेत्रात नोकरी/ व्यावसायिक करिअर घडण्याकरीता लागणारा परवाना (Licence) मिळविण्यासाठी अनिवार्य असणारी परीक्षा आणि ह्या सहकार क्षेत्रातील एका प्रमुख परीक्षेचे

एकही केंद्र कोकण विभागातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात नसल्याने उक्त परिक्षार्थींना दुरच्या ठिकाणी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकण विभागातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जी.डी.सी.ॲण्ड ए. आणि सी.एच.एम. परीक्षाकेंद्र नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने जी.डी.सी. ॲण्ड ए. आणि सी.एच.एम. परिक्षेकरीता कोकण विभागातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात परीक्षा केंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळाच्या दिनांक २२/११/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये जी.डी.सी. ॲण्ड ए. परीक्षा केंद्र रत्नागिरी येथे सुरु करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण यांना अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण यांनी दिनांक १२/०२/२०२५ च्या पत्रान्वये परीक्षार्थी व प्रशासनाच्या दृष्टीने शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. ॲण्ड ए.) आणि सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) या परीक्षांचे परीक्षा केंद्र कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्याच्या ठिकाणी मंजूर करणे सोईचे होईल, असे अभिप्राय दिले आहेत. त्यास अनुसरुन रत्नागिरी येथे सदर परिक्षांचे केंद्र सुरु करणेबाबत निर्णय घेऊन प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुर व जालना येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(१७) * ९४३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्ह्यात सन २०१६ मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचा शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आला असून, माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने सदरचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु होणार असल्याचे जाहीर करूनही अद्याप ते सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना व सोलापूर येथे मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये खाजगी संस्थाचालकांच्या दबावामुळे सुरु झालेले नाही तसेच राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक व तद्नंतर प्राध्यापक या पदावर पदोन्नतीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे व अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवली असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करावयाच्या नवीन भरती बाबतही अडचणी निर्माण झाल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत तसेच प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करावयाच्या नवीन भरतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील यवतमाळ, रत्नागिरी, धुळे, जालना, सोलापूर व लातूर येथील ६ शासकीय तंत्रनिकेतनांमधील पदविका अभ्यासक्रमांचे पदवी अभ्यासक्रमांत श्रेणीवर्धन करुन नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांची स्थापना करणेबाबतचा निर्णय शासन निर्णय दिनांक १३/१०/२०१६ अन्वये घेतलेला होता.तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पुढे धुळे, जालना, सोलापूर व लातूर येथील शासकीय तंत्रनिकेतने आहेत तशीच सद्य:स्थितीत चालू ठेवणेबाबतचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सोलापूर येथील तंत्रनिकेतनात पदविका अभ्यासक्रम सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एकूण २८६ पदांची जाहिरात प्रसिध्द केली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य हमीभाव मिळण्याबाबत

**(१८) * ५७९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, पालघर, वाडा, विक्रमगड, डहाणू, तलासरी, वसई या आदिवासीबहुल भागात भात, नागली, उडीद, तूर या पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असूनही या पिकांना योग्य हमीभाव मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी निराश झाले असून त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य हमीभाव देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

भात व नागली (रागी) या पिकांची खरेदी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत तर उडीद व तूर या पिकांची खरेदी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत केली जाते.

उडीद व तूरच्या खरेदीबाबत गत दहा वर्षापासून पालघर जिल्ह्यात आधारभूत दराने कडधान्य व तेलबिया खरेदीकरीता केंद्र सुरु करणेबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे सहकार व पणन विभागाने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत पणन हंगाम २०२४-२५ मध्ये पालघर जिल्ह्यामध्ये हमीभावाप्रमाणे धान खरेदी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ८ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकांतील मुलींच्या शैक्षणिक शुल्कमाफीबाबत

**(१९) * ८१३ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी, फार्मसी, एमसीए, एमबीए, विधी, शारिरीक शिक्षण यांसह इतर व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थीनींना दिनांक ५ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये या शैक्षणिक वर्षांपासून शुल्कमाफी दिली जाणार असून उच्च शिक्षण व परिक्षाशुल्क देखील माफ करण्यात येणार असल्याचे सदर शासन निर्णयात नमूद केले असून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने खाजगी अभिमत विद्यापीठ व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यातून वगळल्याने चांगल्या शिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्याचा मार्ग बंद झाला असून खाजगी अभिमत विद्यापीठ व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यायचा झाल्यास विद्यार्थींनीना पूर्ण शुल्क भरावे लागणार आहे असे शुल्कमाफीच्या अध्यादेशात उल्लेखही केला असल्याने अभिमत विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थीनीमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असावे असे म्हटले आहे, तथापि, शैक्षणिक फी कशी व कोणाकडून मिळणार याबाबत स्पष्टता नसल्याचेही दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार विद्यार्थींनीना करण्यात येणारी शैक्षणिक शुल्कमाफी कशी व कोणाकडून मिळणार याबाबत स्पष्टता आणण्याबाबत तसेच खाजगी अभिमत विद्यापीठ व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थींनीचे शुल्क माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर शासन निर्णय दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

या विभागाच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील अभिमत विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती अनुज्ञेय करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार पात्र मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यात येत आहे.

(४) उपरोक्त (२) व (३) पाहता, प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर येथील हज हाऊसमधील अल्पसंख्यांक आयुक्तालयाच्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) * ६८५ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर येथील हज हाऊसच्या इमारतीतील अल्पसंख्यांक आयुक्तालयाच्या कार्यालयाचे दिनांक २६ जून, २०२४ रोजी तत्कालीन अल्पसंख्यांक मंत्री महोदयांच्या हस्ते उद्घाटन झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयाकरीता आयुक्तांसह मंजूर असलेल्या एकूण ३६ पदांपैकी आतापर्यंत केवळ दोन पदे भरण्यात आली असून, उर्वरित पदे अद्यापही भरण्यात आली नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर येथील अल्पसंख्यांक आयुक्तालयातील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत अल्पसंख्याक आयुक्तालयामध्ये आयुक्त, सहायक आयुक्त, यांची अतिरिक्त कार्यभाराने नियुक्ती करण्यात आलेली असून १ कार्यालयीन अधीक्षक व २ लिपिक-टंकलेखक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) आयुक्तालयातील मंजूर पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत सा.प्र.वि. तसेच इतर सर्व विभागांकडून त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आली असून त्याबाबतचे स्मरणपत्रे देखील पाठविण्यात आली आहेत. अल्पसंख्याक आयुक्तालयातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता विभागस्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी आरक्षित करण्यात आलेल्या भुखंडाचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१)** * **६८६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीला शासनाने सन १९८७ मध्ये मार्केट यार्डासाठी आरक्षित केलेल्या ४५ एकर जमिनीमध्ये श्री.प्रजापती यांची अतिरिक्त जमीन देखील मार्केट यार्डसाठी आरक्षित करण्यात आली असून मार्केट यार्डचा लेआउट महानगरपालिका, कल्याण आणि पणन संचालक, पुणे यांनी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ले आऊट मंजूर असतानाही स.नं.२९९/२ व २९९/३, स.नं २८८,स.नं २९७ /१ ची जमीन कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाने जिल्हाधिकारी ठाणे यांचे कोणतीही मान्यता न घेता महसूल खात्याचे स्थानिक अधिकारी, जुने जमीन मालक यांनी संगनमत करुन आरक्षित असलेली जमीन स.नं २९९/२,स.नं २९९ रु २ अन्य जमिनीवरील बाजार समितीचे नाव कमी करुन मे.फेमा कंपनी पार्टनर मनोज पुनामियाँ कल्याण यांचे नांवे बेकायदेशीरपणे केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने व इतर संबंधित व्यक्तींनी शासकीय परवान्याचा गैरवापर करुन मार्केट यार्डासाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवासी संकुल किंवा ३२ मजली टॉवर उभारण्याचा प्रयत्न केला असून शासकीय परवान्याचा गैरवापर करुन शेकडो कोटी रुपयाचा भूखंडाबाबत गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नावे आरक्षित असलेली जमीन कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ सचिव, अभियंता, तहसिलदार,कल्याण, तलाठी,कल्याण, मंडळ अधिकारी कल्याण, उप अधीक्षक भूमि अभिलेख, कल्याण यांनी संगनमताने शेकडो कोटींच्या भूखंडचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली तसेच मार्केट यार्डात मे. फेमा कंपनीच्या ७/१२ वरिल नाव कमी करून कमर्शियल व हौसिंग टॉवर उभारण्याची परवानगी नाकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

मार्केट यार्डासाठी आरक्षित केलेली जागा प्रत्यक्षात ४०.५ एकर जमीन आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

कल्याण बाजार समितीच्या मुख्य बाजारासाठी ४०.५ एकर क्षेत्रावर आरक्षण होते व आरक्षणाखालील बहुतांश भूखंड खाजगी मालकाचे होते. त्यामध्ये खंडुबाई मेघजी प्रजापती या खाजगी मालकाच्या नावावर स.नं.२८८/१ व स.नं.२९९/१ मधील जमीन संपादित करण्याची कार्यवाही सन १९९७ मध्ये सुरु केली. मात्र सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण होऊ शकली नाही. नवीन भूसंपादन कायद्यानूसार सदर जमीन संपादन करण्याचा प्रयत्न बाजार समितीने केला होता परंतु, सदरची किंमत जास्त असल्याने जमीन बाजार समितीस संपादीत करता आली नाही.

सदर जमिनीचे ठिकाण बाजार आवाराच्या मधोमध असल्याने तसेच जमीन पडीक अवस्थेत असल्याने जमीन मालकाने स्वत:च्या मालकीच्या जमिनीबाबत खाजगी विकासकाबरोबर सन २००७ मध्ये नोंदणीकृत विकास करार केला होता.सदर बाब कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण यांचेशी निगडीत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे अतिरिक्त कार्यभार असलेल्या सहसंचालकांनी भरती प्रक्रियेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२२) * ९९० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे अतिरिक्त कार्यभार असलेल्या सहसंचालक यांनी भरती प्रक्रियेमध्ये नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावर पदस्थापना करण्यासाठी कर्मचाऱ्यांशी आर्थिक गैरव्यवहार करुन संगनमताने पदस्थापना देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त कार्यभार असलेल्या सहसंचालक यांनी दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे अमरावती विभागातील कंत्राटी शिल्प निदेशकांचे नियमित पदावर पदस्थापना देण्यासाठी आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे अतिरिक्त कार्यभार सहसंचालक यांनी त्यांच्या कार्यकाळात भरती प्रक्रियेमध्ये आर्थिक गैरव्यवहार करुन कंत्राटी शिल्प निदेशकांचे नियमित पदावर पदस्थापना देण्यासाठी घेण्यात आलेल्या चुकीच्या निर्णयांना तात्काळ स्थगिती देवून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे अतिरिक्त कार्यभार असलेल्या सहसंचालक यांनी भरती प्रक्रियेमध्ये नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावर पदस्थापना

करण्यासाठी कर्मचाऱ्यांशी आर्थिक गैरव्यवहार करुन संगनमताने पदस्थापना देण्यात आल्याबाबत नमुद कालावधीमध्ये तक्रार आढळून आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

अमरावती विभागातील कंत्राटी शिल्प निदेशकांची नियमित पदावर पदस्थापना देण्यासाठी आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार आढळुन आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) येथील चारही साखर कारखाने बंद असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी येत असल्याबाबत

**(२३)** * **१२२२ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील चारही साखर कारखाने बंद असल्याने या तालुक्यातील ऊस उत्पादकांना बारामती ॲग्रो,दौंड शुगर, अंबालिका,विठ्ठलराव शिंदे,सहकार महर्षी, श्रीराम शुगर या साखर कारखान्यांना ऊस द्यावा लागत असताना हे साखर कारखाने ऊस उत्पादकांना टनाला २०० ते २५० रुपये कमी भाव देत असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ऊस उत्पादकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि या परिसरातील कारखान्याचे दर समान ठेवण्यासाठी तसेच करमाळा तालुक्यातील सर्व बंद साखर कारखाने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) श्री.मकाई सहकारी साखर कारखाना लि. मकाईनगर, मु. भिलारवाडी, पो.जिंती, ता.करमाळा, जि.सोलापूर व श्री.अदिनाथ सहकारी साखर कारखाना लि. शेलगांव भाळवणी पोस्ट जेऊर ता.करमाळा, जि.सोलापूर हे दोन सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीमुळे तसेच भैरवनाथ शुगर वर्क्स लि. विहाळ, ता.करमाळा, जि.सोलापूर व विठ्ठल रिफाइन्ड शुगर्स लि.पांडे, ता.करमाळा, जि.सोलापूर हे दोन खाजगी साखर कारखाने खाजगी असून चालू गाळप हंगामात अल्प ऊस उपलब्ध असल्याने सुरू झालेले नाहीत. तथापि, सदरहू चारही कारखाने बंद असल्यामुळे सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर, अकलूज, ता.माळशिरस,जि.सोलापूर या कारखान्याने दिनांक ३१/०१/२०२५ अखेर गाळपास आलेल्या ऊसास रक्कम रुपये २८००/- प्रमाणे ऊसदर दिलेला आहे, तसेच कारखान्याने हंगाम २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास अंतिम ऊस दर रक्कम रुपये २९००/- जाहीर केलेला आहे. तर विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि. पिंपळनेर, ता.माढा, जि.सोलापूर या कारखान्याने दिनांक १०/०२/२०२५ अखेर पर्यंत आलेल्या ऊसास रुपये २८००/- प्रमाणे ऊसदर दिलेला आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील दोन्ही साखर कारखान्यांनी सर्व शेतकऱ्यांना एकसमान भाव दिल्याचे दिसून येते. त्यामुळे ऊस उत्पादकांना टनाला २००-२५० रुपये भाव कमी देत असल्याची बाब निर्देशनास आलेली नाही.

सद्य:स्थितीत जिल्ह्यातील ५०% कारखाने ऊस उपलब्धते अभावी बंद झाले आहेत.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील सीमावर्ती भागातून अवैधरित्या होत असलेल्या गुटखा वाहतूकीवर कारवाई करणेबाबत

**(२४) * १५६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे मध्य प्रदेश-बऱ्हाणपूर-इच्छापूर सीमावर्ती भागातून सर्रासपणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा वाहतूक होत असून दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी मुक्ताईनगर येथे २ कोटी रुपयांचा तसेच दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी बोदवड येथे १८ लाख रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुटखा तस्करी कायमस्वरूपी बंद करणेसाठी तसेच कायमस्वरूपी गस्त पथक नेमणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजी मुक्ताईनगर, जि.जळगाव पोलिसांनी मध्य प्रदेश ब-हाणपुर सीमावर्ती भागातून वाहतूक करताना तंबाखू, गुटखा व इतर प्रतिबंधित अन्नपदार्थ जप्त केला आहे. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द मुक्ताईनगर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल क्र. ४१९/२०२४ नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपींना दिनांक ०१/१२/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मुक्ताईनगर पोलीस स्टेशनमार्फत सुरु आहे.

तसेच, दिनांक १२ डिसेंबर,२०२४ रोजी बोदवड पोलिसांनी बोदवड रोड येथून वाहतूक करताना सुगंधित पानमसाला, तंबाखू व इतर प्रतिबंधित अन्नपदार्थ जप्त केला आहे. या प्रकरणी संबंधितांविरुध्द बोदवड पोलीस ठाणे येथे प्रथम खबरी अहवाल क्र.२४३/२०२४ नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपींना दिनांक १२/१२/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास बोदवड पोलीस स्टेशनमार्फत सुरु आहे.

राज्यामध्ये अन्न व औषध प्रशासनामार्फत सर्व आस्थापनांची तपासणी करून प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा आढळल्यास सदर साठा जप्त करण्यात येवून आस्थापनेविरुध्द व संबंधित व्यक्तीविरुध्द प्रथम खबरी अहवाल संबंधित पोलीस ठाण्यात नोंदविण्यात येतो. तसेच, प्रतिबंधित

अन्नपदार्थांच्या साठवणूकीसाठी, विक्रीसाठी पुर्नवापर न होण्याकरीता संबंधित आस्थापना सील केल्या जातात. प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहनातून वाहतूक होत असल्यास तसेच, साठा करुन ठेवला असल्यास प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुर्नवापर न होण्याकरीता सदर वाहने जप्त करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२५) * २४९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रांत पाटील, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागात सहाय्यक आयुक्त, औषध निरीक्षक व रसायन शास्त्रज्ञ इत्यादीची ७०२ पदे मंजूर असून प्रत्यक्षात केवळ ३७५ अधिकारी कार्यरत असून ५० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रयोगशाळांतील सहाय्यक आयुक्तांची ४२ आणि औषध निरीक्षकांची ११९ पदे रिक्त असल्याने बनावट औषधांचा तपासणी अहवाल येण्यास विलंब होत असल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक जिल्ह्यांमध्ये औषध तपासणी प्रयोगशाळांमध्ये नमुना घेण्यासाठी एकही औषध निरीक्षक नसल्याने औषधांचे घेतलेले नमुने व बनावट औषधे, गोळया यांची तपासणी होत नसल्याने बनावट औषध कंपन्यांवर नियंत्रण राहत नाही, औषध प्रशासनाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने अन्न व बनावट औषधी गोळयांचे नमुने घेण्यासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून त्याचा औषध परवाना व औषध तपासणीवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विभागातील रिक्त पदांमुळे अन्न व औषधांचे नमुने प्रयोग शाळेत तपासणीविना पडून राहतात त्यामुळे भेसळ करणाऱ्यावर अहवालाअभावी वेळेवर कारवाई करण्यास अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रयोगशाळांतील सहाय्यक आयुक्त, औषध निरीक्षकांची आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच प्रयोगशाळेतील नमुने तातडीने तपासून भेसळ करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सद्य:स्थितीत सहाय्यक आयुक्त (औषधे) संवर्गाची ६७ पदे मंजूर आहेत त्यापैकी ५६ पदे भरलेली असून ११ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्रमांक २०२/२०२२, दिनांक १९/३/२०२२ अन्वये सध्या रिक्त व संभाव्य रिक्त पदांकरीता एकूण १५ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

औषध निरीक्षकांच्या मंजूर २०० पदांपैकी १५२ पदे रिक्त आहेत त्यापैकी १०९ पदे भरण्यासाठी दिनांक १२/०२/२०२५ रोजी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे.

तसेच प्रयोगशाळेतील विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ यांची १९ पदे व वरिष्ठ तांत्रिक सहायक यांची ३७ पदे भरण्यासाठी परीक्षा पार पडली असून, नेमणूक प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

प्रयोगशाळेतील नमुने तातडीने तपासून घेण्यासाठी अन्न सुरक्षा बळकटीकरण या योजनेंतर्गत ५८ कंत्राटी तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कापूस हमीभावापेक्षा कमी दराने विकावा लागत असल्याबाबत

**(२६)** * **६११ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२१ कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय कापूस महामंडळाने (सीसीआय) माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली असून दिवाळीपूर्वी कापूस खरेदी केंद्र सुरु करून मालाची विक्री केल्यानंतर पैसे सात दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कापूस खरेदी केंद्र पूर्णपणे सुरू न झाल्याने शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विकावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापूस खरेदी केंद्र सुरु करून मालाची विक्री केल्यानंतर पैसे सात दिवसांच्या आत शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) केंद्र शासनाचे नोडल एजंट भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) यांनी राज्यात १२४ कापूस खरेदी केंद्रे उघडली. सदर खरेदी केंद्रांवर दिनांक ०५/०२/२०२५ अखेर १३३.२४ लाख क्विंटल एफएक्यू प्रतिचा चांगला कापूस किमान हमी भावाने खरेदी केला आहे.

(३) सीसीआयने किमान हमी दराने खरेदी केलेल्या कापसाची एकूण रुपये ९४६९.२१ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना अदा केली आहे. अपवादात्मक प्रकरणी शेतकऱ्यांच्या कागदपत्रांतील तसेच बँक खात्यातील त्रुटीमुळे ७ दिवसांच्या मुदतीनंतर रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील सर्व शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत

**(२७)** * **१५५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने सर्व जिल्हयांमधील शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील केवळ २४ टक्के शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या ४५२ शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीकडे जिल्हा परिषदेने प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात तसेच राज्यातील उर्वरित सर्व शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरीता शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. अहिल्यानगर यांचे मार्फत जिल्हा नियोजन व विकास समिती, अहिल्यानगर यांचेकडे निधी मागणी करण्यात आली आहे.
(३) जिल्हा नियोजन व विकास समिती, अहिल्यानगर यांचेकडून रक्कम रुपये ५,००,००,००० /- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी मात्र) इतका निधी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरिता सी. सी. टी. व्ही. बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रांन्वये सर्व मा.पालकमंत्री यांना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरीता जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजनेमधून निधी उपलब्ध करुन देणेबाबत प्रयत्न करण्याची विनंती केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) * १४१० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकून ९,४९,०६३ रुपयांचा ६ टन २१ किलो भेसळयुक्त तेलाचा साठा, तर ४,०६,६२२ रुपयांचा ३३५ किलो रवा, मैदा, बेसनचा साठा जप्त करण्यात आला असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपुर येथील अन्न वऔषध प्रशासन विभागात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची ४ पैकी ३ पदे, औषध निरिक्षकांची २ पदे, यासोबतच सहाय्यक आयुक्त (औषधे) ड्रग (निरीक्षक) अशी एकूण ७ पदे रिक्त असल्याने अन्न तपासणीचे अहवाल प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपुर येथील अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच अन्नधान्यात व तेल भेसळ करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्यात अन्न सुरक्षा अधिकारी यांची एकूण ३५० पदे मंजूर असून त्यापैकी १३२ पदे भरलेली आहेत आणि २१८ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अन्न सुरक्षा अधिकारी यांची एकूण १९४ पदे भरण्याची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे.

औषध निरीक्षक संवर्गाचे १०९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे. व सहायक आयुक्त (औषधे) संवर्गाकरीता सद्या रिक्त व संभाव्य रिक्त अशा एकूण १५ पदांची जहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर भरती प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर चंद्रपुर येथील अन्न व औषध प्रशासनातील रिक्त पदे भरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी मे. सुनिल किराणा स्टोअर्स, जि.चंद्रपूर या पेढीतून रिफाईंड पामोलीन ऑईल (राज गोल्ड) व रिफाईंड सोयाबीन ऑईल (हेल्थी बिन) या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणास्तव घेऊन ९८६.८ किलो साठा जप्त करण्यात आला आहे. त्यापैकी रिफाईंड सोयाबीन ऑईल (हेल्थी बिन) या अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रमाणीत घोषीत करण्यात आला असून रिफाईंड पामोलीन ऑईल (राज गोल्ड) या अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रलंबित आहे.

दिनांक २१/१०/२०२४ रोजी मे.मुंधडा मार्केटींग, चंद्रपूर या पेढीतून रिफाईंड सोयाबीन ऑईल (सी. के. लाईट) या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणास्तव घेण्यात आला होता.सदर अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रमाणीत घोषीत करण्यात आला आहे.

तसेच, दिनांक २१/१०/२०२४ रोजी मे. मुसा ऑईल इंडस्ट्रीज, जि.चंद्रपूर या पेढीमधून, रिफाईंड सोयाबीन ऑईल (वी.आय.पी.किचन), रिफाईंड सोयाबीन ऑईल (रॉयल ईन), मैदा (रॉयल ईन), रवा (रॉयल ईन) या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणास्तव घेण्यात आले आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या सर्व ९ अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत.

सदर अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदीनुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शैक्षणिक सत्र सुरु होवूनही विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळाला नसल्याबाबत

**(२९)** * **१४९१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विषेशत: पालघर जिल्ह्यांतील गणवेश वितरणासंबंधी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या १ लाख ६० हजार ७७१ विद्यार्थ्यांपैकी ६८ हजार १३६ विद्यार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ अखेर गणवेश वाटप करण्यात आले असून ९२ हजार ५९५ विद्यार्थी दुसरे शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतरही गणवेशापासून वंचित आहेत, तसेच घनसावंगी (जि.जालना) येथील रांजणी जिल्हा परिषद उर्दु शाळेतील १ ली ते ७ वी पर्यंत १४१ मुले व २२४ मुली असे एकूण ३६५ विद्यार्थ्यांना शाळेचे मोफत गणवेश वाटप करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपात झालेल्या अनियमिततेमुळे समग्र शिक्षा अभियान कार्यालयाने दुसरा गणवेश शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्यामार्फत गावपातळीवरील कारागिरांकडून शिलाई करुन घ्यावी व गावपातळीवरील कारागिरांना सदर गणवेशसाठी १०० रुपये शिलाई देण्याचे ठरविण्यात आले असूनही अदयाप गावपातळीवर कापड पोहचले नसल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या पालकांनी गट शिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे हाफ पँट, शर्टच्या ऐवजी कुर्ता आणि पूर्ण गणवेश शिवून देण्याची मागणी केली असून गावपातळीतील कारागीर १०० रुपयांमध्ये गणवेश शिलाई करुन देण्यास तयार नसल्याने दुसरा गणवेश शिलाईचीही समस्या निर्माण झाली असल्याने दुसरे शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतरही विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घनसावंगी (जि.जालना) येथील रांजणी जिल्हा परिषद उर्दु शाळेतील पहिली ते सातवीच्या विद्यार्थांना समग्र शिक्षा अभियानअंतर्गत दुसरा गणवेश देण्याबाबत तसेच पालघर जिल्ह्यातील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या ९२ हजार ५९५ विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबत तसेच गावपातळीवरील कारागिरांना

गणवेश शिवण्याकरीता देण्यात येणारी शिलाई रक्कम वाढविण्याबाबत व कारागिरांना गणवेशाचे कापड वेळेत पुरवठा करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्रात दुसरा गणवेश वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

समग्र शिक्षा व राज्य मोफत गणवेश वाटप योजनेंतर्गत दोन गणवेशाचा लाभ देण्यात येतो. त्यापैकी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एक गणवेश महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत शिलाई करुन व दुसरा गणवेश (स्काऊट व गाईड) शाळा व्यवस्थापन समितीमार्फत स्थानिक पातळीवर शिलाई करुन देण्यात येत आहेत. शिलाईसाठी प्रति गणवेश रुपये ११०/- अशी रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

मोफत गणवेश योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यामध्ये पात्र लाभार्थी विद्यार्थी १,६०,६६४ इतकी आहे. त्यापैकी स्काऊट व गाईड अनुरुप गणवेशाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना तसेच, सद्य:स्थितीत नियमित गणवेशाचा लाभ ७०,४८९ विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.

तसेच, घनसावंगी जिल्हा जालना येथील रांजणी जिल्हा परिषद ऊर्दू शाळेतील सर्व पात्र ३६५ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे.

(२),(३),(४) व (५) सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण ४४,६०,००४ इतके विद्यार्थी लाभार्थी आहेत. विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ विहित कालमर्यादेत देण्यासाठी दुसऱ्या गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने दुसरा गणवेश शिलाई करुन देण्यात येणाऱ्या गणवेशाचे कापड योजनेंतर्गत पात्र शाळांना पुरवठा करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरू आहे.

शासन निर्णय दिनांक १० जून, २०२४ नुसार नियमित व स्काऊट व गाईड गणवेशाची रचना निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये गणवेशाचा लाभ देण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ पासून मोफत गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचा निर्णय दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, सदर शासन निर्णयान्वये विद्यार्थीनींना इयत्तेनिहाय पिनो-फ्रॉक, शर्ट-स्कर्ट, सलवार-कमीज देण्याचा निर्णय घेण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात आली आहे.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांच्या मिलेट न्यूट्रिटिव्ह बारमध्ये अळया आणि बुरशी आढळून आल्याबाबत

**(३०) * ११ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या २३७१ प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील मुलांना पुरविण्यात येणाऱ्या मिलेट न्यूट्रिटिव्ह बारमध्ये जिवंत अळया आणि बुरशी आढळून आली असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माहे ऑगस्ट,२०२४ पासून अनेक शाळांनी वरिष्ठांना कळवूनही मुलांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या मिलेट न्यूट्रिटिव्ह बारचे वाटप सुरूच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने मिलेट न्यूट्रिटिव्ह बारचे वाटप करणारे कंत्राटदार व इतर संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच मिलेट न्यूट्रिटिव्ह बारचे वाटप थांबवून सकस व ताजे अन्न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या मिलेट न्यूट्रिटिव्ह बारमध्ये अळया व बुरशी आढळून आल्याची बातमी लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) पालघर जिल्ह्यातील एकूण ३०७० शाळेतील विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त पुरक पोषण आहार म्हणून मिलेट न्युट्रिटिव्ह बारचे वाटप करण्यात येत आहे. सदर शाळांपैकी दोन शाळांमध्ये वाटप केलेल्या न्युट्रिटिव्ह बारबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनंतर सर्व गटशिक्षणाधिकारी यांना यादृच्छिक पध्दतीने शाळांना भेटी देवून पूरक आहाराची तपासणी करण्याबाबत निर्देश दिले होते. तसेच, तक्रार प्राप्त शाळांमधील न्युट्रिटिव्ह बारचे नमूने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. मिलेट न्युट्रिटिव्ह बारबाबत प्रस्तुत क्षेत्रिय व प्रयोगशाळा तपासणी अहवाल सकारात्मक आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील हिंद केसरी आणि महाराष्ट्र केसरी यांना नियमीत मानधन मिळण्याबाबत

**(३१) * ९६४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७ हिंद केसरी व २० महाराष्ट्र केसरी पैलवान असून त्यांना प्रत्येकी ६ हजार दरमाह मानधन दिले जात असून त्यांना गत आठ महिन्यांपासून मानधन मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंद केसरी आणि महाराष्ट्र केसरी मल्लांच्या मानधनात १५ हजार रुपये पर्यंत वाढ करण्याची घोषणा केली असून, कुस्तीपटूंच्या मानधनाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्वी दिले जात असलेले मानधन व वाढीव मानधन हिंद केसरी आणि महाराष्ट्र केसरी, तसेच काही मल्लांच्या विधवा पत्नींना मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हिंदकेसरी,आणि महाराष्ट्र केसरी यांचे वाढीव मानधन वेळेवर व नियमित मिळण्याबाबत तसेच गेल्या दहा महिन्यांपासून प्रलंबित असलेले मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशत खरे आहे.

राज्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वयोवृध्द खेळाडूंना रुपये २५००/-, ४०००/- व ६०००/- या दराने मानधन अनुज्ञेय होते. आभासी वैयक्तिक ठेव खाते (VPDA) या नवीन प्रणालीमुळे मानधन अदा करण्यास काही कालावधी लागला आहे.

(२) राज्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वयोवृध्द खेळाडूंच्या मानधनात शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये वाढ करण्यात आली आहे.

(३) व (४) खेळाडूंना व काही मल्ल्लांच्या विधवा पत्नींना दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतचे मानधन अदा करण्याबाबतची कार्यवाही झाली आहे. तसेच त्यापुढील कालावधीचे सुधारित दराने मानधन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस शिधापत्रिका रद्द करुन पात्र लाभार्थ्यांना धान्य वाटप करण्याबाबत

**(३२)** * **६९३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय खाद्य महामंडळ आणि शासनाकडून वितरित होणारे सुमारे २८ टक्के खाद्य, बनावट शिधापत्रिकाधारकांमुळे गरजु व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे "इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स"ने केलेल्या अभ्यासात माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासानुसार राज्य व केंद्र शासनाचे रुपये ६९ हजार कोटींपेक्षा अधिक नुकसान झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट शिधापत्रिका रद्द करून गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत धान्य व इतर सकस आहार मिळण्याबाबत तसेच बनावट शिधापत्रिका वाटप करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत इष्टांकाच्या मर्यादेत पात्र लाभार्थ्यांना धान्य वितरण करण्याच्या दृष्टीने शिधापत्रिका धारकांचे ई-केवायसी मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. तसेच रास्तभाव दुकानदार ई-पॉस मशिनवर संलग्न असलेल्या लाभार्थ्यांची बायोमॅट्रिक पडताळणी करून धान्य वितरण करतात.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे - नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तळोदा शाखेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * १६०१ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १९९०० ला दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे - नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तळोदा शाखेत सुमारे दीड कोटीचा रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धुळे - नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तळोदा शाखेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तळोदा शाखेत कर्जवाटपात झालेल्या गैरव्यवहारा प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बँकेचे मुख्यालयीन ऑडीट इन्स्पेक्शन व दक्षता विभाग यांचेमार्फत अंतर्गत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये बँकेच्या एकूण ६ कर्मचाऱ्यांनी रुपये १,८९,७२,२७०/- रकमेचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आले. या कर्मचाऱ्यांनी सदरचा गैरव्यवहार त्यांनी केल्याचे मान्य करुन गैरव्यवहाराची रक्कम व्याजासहित भरण्याची त्यांची संयुक्त व वैयक्तीक जबाबदारी असल्याचे लेखी हमीपत्र दिले आहे. यापैकी ३ कर्मचाऱ्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीनुसार त्यांच्याकडील रुपये ३९,०३,९१७/- इतक्या गैरव्यवहार रकमेचा संपूर्ण भरणा केला आहे. तर उर्वरीत ३ कर्मचाऱ्यांनी त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीनुसार रुपये १,६२,९०,५०९/- इतक्या गैरव्यवहार रकमेपैकी केवळ रुपये १२,७८,९६२/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. बँकेने दिलेल्या मुदतीमध्ये या ३ कर्मचाऱ्यांनी उर्वरीत रकमेचा भरणा न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द तळोदा पोलीस ठाण्यामध्ये दिनांक ०९/१२/२०२४ रोजी गुन्हा रं.नं ३५६/२२४ दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या गैरव्यवहाराबाबत आर्थिक गुन्हे शाखा, नंदुरबार यांचेकडून चौकशी सुरु असून बँकेमार्फत देखील सदर कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील लाभार्थ्यांना थकीत विद्यावेतन मिळण्याबाबत

**(३४) * १३६ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना माहे जुलै,२०२४ पासून सुरू करण्यात आली असून त्यामध्ये ८७,१४९ युवकांना प्रशिक्षण व विद्यावेतन देण्यात येत असल्याने सदर योजनेतंर्गत युवक युवतींची केवळ सहा महिन्यांकरीता करण्यात आलेला नियुक्तीचा कालावधी संपत आला असल्याने प्रशिक्षणार्थींचे

भवितव्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत समाविष्ट युवक युवतींना दरमाह विशिष्ट तारखेला विद्यावेतन दिले जात नाही, तसेच गेल्या दोन ते तीन महिन्यांचे विद्यावेतन थकीत असून सदर योजनेच्या कालावधीत वाढ करून विद्यावेतन वेळेत मिळावे अशी मागणी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'च्या कालावधीत वाढ करून सदर योजनेंतर्गतच्या लाभार्थींना थकीत विद्यावेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९/०७/२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना (CMYKPY)" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना शासकीय /निमशासकीय /खाजगी आस्थापनांत ६ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. दिनांक १७/०२/२०२५ अखेर सदर योजनेंतर्गत १,२८,१०६ इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत. सदर बाब ही नियुक्ती नसून प्रशिक्षणाची संधी आहे. या योजनेंतर्गत मर्यादीत वेळेत जास्तीत जास्त उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाचा लाभ घेता यावा, याकरीता कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने इतका निश्चित करण्यात आला आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या कालावधीत वाढ करावी, विद्यावेतन वेळेत मिळावे या मागण्यांबाबत प्रशिक्षणार्थ्यांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

सदर योजनेंतर्गत उमेदवार ज्या आस्थापनेत प्रशिक्षण घेत आहे, त्या आस्थापनेने संबंधित उमेदवारांची उपस्थिती शासनाने विहीत केलेल्या पोर्टलवर नोंदविणे आवश्यक असते. सदर उपस्थिती योग्य असल्याची तपासणी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त यांच्यामार्फत करण्यात येते. तद्नंतर उमेदवाराचे विद्यावेतन अदा करण्यात येते. दिनांक १७/०२/२०२५ पर्यंत रुजू झालेल्या १,२८,१०४ प्रशिक्षणार्थ्यांपैकी १,२३,२५४ प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी नोंदविण्याची प्रक्रीया पूर्ण झाली असून १,१८,६६३ प्रशिक्षणार्थ्यांना त्यांना अनुज्ञेय असलेले विद्यावेतन अदा करण्यात आले आहे.

सदर योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात असून सर्व प्रशिक्षणार्थ्यांना विहीत कालावधीत विद्यावेतन अदा करण्याकरीता प्रशिक्षणार्थ्यांच्या बॅंक खात्याच्या अचूक तपशीलासह त्यांची उपस्थिती शासनाने विहीत केलेल्या पोर्टलवर वेळेवर नोंदविण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आठवी इयत्तेतील २५ टक्के विद्यार्थ्यांना मराठी वाचता येत नसल्याबाबत

**(३५) * १४९३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आठवी इयत्तेतील २५ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेतील उतारादेखील वाचणे जमत नसल्याचे भीषण वास्तव दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी 'ॲन्यूअल स्टेट्स ऑफ एज्युकेशन' म्हणजेच 'असर'ने जाहीर केलेल्या १४ व्या अहवलातून निदर्शनास आले असून मराठवाड्यातील ८ पैकी ६ जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील २९ टक्के विद्यार्थ्यांनांही मराठी वाचता येत नसल्याचे विभागीय प्रशासनाने केलेल्या पहाणीमध्ये माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षणाचा पायाच कच्चा असल्याने आठवी इयत्तेतील ४० टक्के विद्यार्थ्यांना वजाबाकी आणि भागाकार ही आकडेमोडदेखील करणे शक्य होत नसल्याचे उक्त प्रशासनाने केलेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे नुकसान करणाऱ्या संबंधित शाळा प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच या विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्टया प्रगत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

विभागीय प्रशासनाने केलेल्या पाहणीच्या प्राप्त अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील बीड व लातूर वगळता इतर जिल्ह्यांच्या अहवालानुसार इयत्ता ३ री च्या भाषा विषयातील क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या ७१.७२% असून क्षमता अप्राप्त विद्यार्थ्यांची संख्या २८.२८% असल्याचा अहवाल प्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

विभागीय प्रशासनाने केलेल्या पाहणीच्या प्राप्त अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील बीड व लातूर वगळता इतर जिल्ह्यांच्या अहवालानुसार इयत्ता ३ री च्या गणित विषयातील क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या ७१.६६% असून क्षमता अप्राप्त विद्यार्थ्यांची संख्या २८.३४% असल्याचा अहवाल प्राप्त आहे.

विभागीय प्रशासनाने केलेल्या पाहणीच्या प्राप्त अहवालानुसार इयत्ता आठवीच्या पाहणीचा अहवाल दिसून येत नाही.

(३) बीड व लातूर जिल्हा वगळता उर्वरित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियमित व नियोजनबध्द कार्यवाही करण्याची सूचना व विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अपेक्षित क्षमतांपर्यंत आणण्यासाठी दरमहा आढावा घेण्यासंबंधी संबंधित विभागीय प्रशासनाने अधिनस्त प्रशासनास सूचित केले आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांचे पायाभूत भाषा साक्षरता व संख्याज्ञान उत्तमप्रकारे विकसित करण्यासाठी शिक्षकांसाठी मार्गदर्शक साहित्य विकसित करून पुरविण्यात आले आहे तसेच प्रशिक्षणेही घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीककर्ज वाटपाच्या नवीन निकषांमुळे शेतकऱ्यांना अडचणी येत असल्याबाबत

**(३६) * ९६६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाबार्डने पीककर्ज वाटपाचे निकष बदललेले असून “८अ” या शेतजमीनीच्या मालकी उताऱ्यावर शेतकऱ्यांच्या वाट्याला जेवढे क्षेत्र असेल तेवढ्याच क्षेत्राचे पीककर्ज शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश शेतकऱ्यांच्या “८ अ” वर एकत्रित कुटूंबातील सर्व व्यक्तींची नावे असल्यामुळे हक्कसोड पत्र केल्याशिवाय ती नावे कमी होणार नाहीत, त्यामुळे “८ अ” च्या निकषामुळे शेतकऱ्यांना पीककर्ज कमी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्जवाटपाच्या पध्दतीत बदल केल्याने हक्कसोड पत्रावरुन अनेक कुटुंबात वादाचे प्रसंग निर्माण होवून सेवा संस्थांचे व्यवहार कमी होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतीसाठी पीककर्जाचे वाटप करण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेला सभासद असलेल्या व “८अ” वर नावे असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचे संमती पत्र विचारात घेवुन त्याच्या ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्रानुसार पीक कर्ज देण्यासंदर्भात तसेच बदललेल्या निकषामुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाच्या हेक्टरी अथवा एकरी मर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
नाबार्डमार्फत पीक कर्ज वाटपाचे निकष बदलण्यात आले नाहीत. तथापि, बँकामार्फत शेतकऱ्यांच्या हिस्साच्या क्षेत्रावर अनुज्ञेय पीक कर्ज वितरीत करण्यात येते.
(२) व (३) हे खरे नाही.

शेतीसाठी पीक कर्ज वाटप करत असताना ८-अ तथा ७/१२ उताऱ्यावर नमूद हक्क अधिकाराइतपत संबंधित शेतकऱ्यास बँकामार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या धोरणाप्रमाणे ८-अ तथा ७/१२ उताऱ्यावर एकापेक्षा अधिक शेतकऱ्यांची नावे असल्यास अन्य शेतकऱ्यांचे संमतीपत्र /घोषणापत्र घेऊन एका शेतकऱ्यास संपूर्ण क्षेत्रावर कर्जपुरवठा करण्यात येतो. हक्कसोड पत्रकावरुन अनेक कुटुंबात वादाचे प्रसंग निर्माण होऊन सेवा संस्थांचे व्यवहार कमी होत आहेत, ही बाब अद्याप निदर्शनास आलेली नाही.

(४) राज्यातील शेतकऱ्यांना पीकांच्या उत्पादनासाठी बँकामार्फत दयावावयाच्या पीकनिहाय कर्जदराची निश्चिती करण्यासंदर्भात सहकार आयुक्त व निबंधक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०६/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

या समितीमार्फत कृषी यंत्र/यंत्रसामुग्री, कृषी निविष्ठा/खते, रोजगार यामधील दरवाढ, त्याचप्रमाणे संबंधित पिकाची उत्पादकता, उत्पादन मुल्य, बाजारभाव इ. बाबी विचारात घेण्यात येऊन त्यानुसार कर्जदरामध्ये वाढ करण्यात येते.

सदर समितीमार्फत पीकनिहाय कर्जदराची निश्चिती प्रतीवर्षी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.